# ई–कोर्ट सेवा मोबाइल ॲप




GET IT ON Google Play

Download on the App Store


॥ यतो धर्मस्ततो जयः ॥

**Circulated by:**

ecommittee

supreme court of India

# ई–कोर्ट सेवा मोबाइल ॲप




द्वारा प्रसारित,

ई_ समिती,

भारताचे सर्वोच्च न्यायालय.

# ई कोर्टस् सेवा मोबाइल ॲप

द्वारा प्रसारित

ई–समिती, भारताचे सर्वोच्च न्यायालय

द्वारा लेखक,

**श्रीमती**. आर. अरुलमोझिसेलवी, एम.एल.,

सदस्य, (मानव संसाधन)

ई–समिती, भारताचे सर्वोच्च न्यायालय.

मराठी भाषेत अनुवादित
द्वारा

कु. व्ही. आर. घाणेकर, वरिष्ठ अनुवादक व दुभाषी, कु. एस. एस. कदम, वरिष्ठ अनुवादक व दुभाषी, श्रीम. ए. डी. शिंदे, वरिष्ठ अनुवादक व दुभाषी, श्रीम. एस. एस. शेटे, वरिष्ठ अनुवादक व दुभाषी, श्री. पी.व्ही. मांजरेकर, वरिष्ठ अनुवादक व दुभाषी,श्रीम.एम. पी.सावंत, वरिष्ठ अनुवादक व दुभाषी,श्रीम.पी. एस.पोतनीस, कनिष्ठ अनुवादक व दुभाषी, श्री. एस .यू. गडांकुश, कनिष्ठ अनुवादक व दुभाषी, श्रीम.एस.आर.परब, कनिष्ठ अनुवादक व दुभाषी, कु. आर. पी. देवधर, कनिष्ठ अनुवादक व दुभाषी.

पहिली आवृत्तीः फेब्रुवारी, 2021

अस्वीकरण

(ई समितीने प्रसारित केलेली ही संदर्भ सामग्री केवळ अभ्यास आणि प्रशिक्षण उद्देशासाठी आहे. या सामग्रीमध्ये आलेले संदर्भ सूचक असून ते कोणत्याही अधिकृत किंवा न्यायालयीन संदर्भासाठी वापरले जाऊ शकणार नाहीत. नाहीत.)

DR JUSTICE D Y CHANDRACHUD
Judge, Supreme Court of India

**Foreword**

The e-Committee of the Supreme Court has been at the forefront of introducing digital reforms in the field of law. In the past one year, the pandemic has also pushed advocates, judges and litigants to adopt high tech solutions due to the closure of offices and courts in light of lockdowns and public health concerns. Working remotely, virtual courts, digital workplaces and electronic case management have become integral to how the legal profession is practiced and conducted. This has given us a rare opportunity to embrace technology not just as an interim measure but to transform our legal system to make it more efficient, inclusive, accessible and environmentally sustainable. The e-Courts Services Mobile Application is a step in this direction.

The e-Courts Services Mobile Application is a one stop electronic case management tool (ECMT) for advocates and litigants for cases filed in the District Courts and High Courts. It provides complete case history from filing till disposal including date wise case diary. It allows users to access orders/judgments, cause list, transfer details of the case and interim application status. A unique feature of the application is that an advocate can maintain a digital diary of all cases under "My Cases" tab.

All these facilities are available free of cost. The usage of the application will not only reduce the footfall at the court complexes but will also save time and effort for judges, court staff and other stakeholders. It will also ensure that geographical

constraints do not hinder access to relevant case information. We have also attempted to make the application accessible to persons with disabilities.

The ECMT tools have been discussed in detail in the manual with screenshots. Keeping in mind the linguistic and cultural diversity of India, the manual has been translated in 11 regional languages.

The improvement in technological capacities must be accompanied by a change in culture and mindset. I am happy to note that many advocates and litigants have already embraced the services offered through this mobile application with more than 57 lakh downloads so far. The application will pave the way for optimizing our legal system in an ever-evolving digital world.

**[Dr Justice D Y Chandrachud]**

बरुण मित्रा, भा.प्र.से.
BARUN MITRA, IAS

सत्यमेव जयते

सचिव
न्याय विभाग
विधि और न्याय मंत्रालय
भारत सरकार
SECRETARY
DEPARTMENT OF JUSTICE
MINISTRY OF LAW & JUSTICE
GOVERNMENT OF INDIA

## FOREWORD

As the legal world is gradually turning digital globally, the process of ICT enablement of the judicial landscape in India has concurrently made significant strides. As an integral part of this multi-dimensional initiative, the eCourts Services Mobile App has been widely hailed as an effective Electronic Case Management Tool (ECMT). Its popularity is manifested in the growing number of downloads by lawyers, having already crossed the 57 lakh figure.

Robust Case Management and sound supporting systems are at the core of any well-functioning legal architecture. ECMT tool, enables a lawyer to efficiently manage case information, document assembly, calendaring, time-tracking of case status, accessing judicial decisions, compliance requirements etc. To cap it, ECMT is of immense convenience being available 24 x 7 with no geographical boundaries and easy access on no-cost basis. The eCourts Services Mobile App with its digital diary features has thus evolved into a must-have tool for lawyers to promotetheir professional efficiency.

Publication of this Manual on eCourts Services Mobile App is yet another laudable step by the eCommittee of the Supreme Court to create large scale awareness of this ECMT and in bringing its benefits to the doorstep of the lawyers' community. The manual is also available in Hindi and several other regional languages like Punjabi, Tamil, Gujarati, Odia and Nepali thus enhancing its outreach. I am confident that this Manual will be of great utility for the legal fraternity.

**25th February, 2021**
**New Delhi**

**(Barun Mitra)**

# ई कोर्टस् सेवा मोबाइल ॲप

## अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| १. | "ई कोर्टस्" सेवा मोबाइल ॲप कसे स्थापित करावे | ८ |
| १.१ | ई कोर्टस् वेबसाइट https://ecourts.gov.in वरून डाउनलोड करा. | ८ |
| १.२ | Android साठी Google Play Store वरून डाउनलोड करा | ९ |
| १.३ | आयफोन /आयपॅडसाठी Apple स्टोअर वरून थेट डाउनलोड करा | ९ |
| २ | ई कोर्टस् ॲप कॉन्फिगर करा | १० |
| ३ | ई कोर्टस् मोबाइल ॲप सहा भारतीय भाषांमध्ये | ११ |
| 3.1 | ई कोर्टस् सेवा मोबाइल ॲपची मूलभूत चिन्हे माहित असणे आवश्यक आहे | ११ |
| ४.१ | स्वागत पृष्ठ | १२ |
| ४.2 | मेनू यादी चिन्ह | १२ |
| ४.3 | जिल्हा न्यायालय /उच्च न्यायालयातील प्रकरणांचा तपशील | १२ |
| ४.४ | मुख्य मेनू पर्याय | १२ |
| ४.५ | सीएनआर शोध | १३ |
| ४.६ | प्रकरण स्थिती शोध | १३ |
| ४.७ | वाद सूची | १३ |
| ४.८ | माझी प्रकरणे | १३ |
| ४.९ | माझी प्रकरणे तारीख/ जिल्हावार. | १४ |
| ४.१० | कॅलेंडर पर्याय | १४ |
| ४.११ | रिफ्रेश बटण | १४ |
| ४.१२ | माझ्या प्रकरणांतर्गत शोध पर्याय | १४ |
| ४.१३ | क्यूआर कोड | १४ |
| ४.१४ | क्यूआर कोड स्कॅन करा | १४ |
| ४.१५ | आयए तपशील | १५ |

| | | |
|---|---|---|
| ४.१६ | हस्तांतरण तपशील | १५ |
| ४.१७ | अधीनस्थ न्यायालयाची माहिती | १५ |
| ४.१८ | प्रकरण  इतिहास | १६ |
| ५. | ई कोर्टस् सेवा मोबाइल ॲप व्दारे प्रकरणांचा संपूर्ण इतिहास मिळवा | १७ |
| ६. | शोध प्रकरणांचा पर्याय | १८ |
| ७. | सीएनआर क्रमांक वापरुन  शोध प्रकरणे | १८ |
| ७.१ | सीएनआर क्रमांक म्हणजे काय | १८ |
| ७.२ | आपला सीएनआर क्रमांक कसा जाणून घ्यावा | १९ |
| ७.३ | ई कोर्टस्  मोबाइल ॲपवरून सीएनआर क्रमांक कसा मिळवावा | १९ |
| ७.४ | सीएनआर क्रमांक  वापरुन प्रकरणे कशी शोधायची | २० |
| ८. | शोध प्रकरणांची स्थिती: विविध पर्यायांचा वापर करून | २२ |
| ८.१ | प्रकरण क्रमांक  पर्याय वापरुन प्रकरणांची  स्थिती पहा. | २३ |
| ८.२ | फाइलिंग क्रमांक पर्यायाचा वापर करून प्रकरणांची  स्थिती पाहणे | २४ |
| ८.३ | वकिल  पर्यायाचा वापर करुन प्रकरणांची स्थिती पहाणे | २४ |
| ८.३.१ | वकिलांच्या नावानुसार शोध | २५ |
| ८.३.२ | बारकोड वापरून शोध | २६ |
| ८.३.३ | तारीख प्रकरण यादी (वकिलांची वाद सूची )वापरून शोध | २७ |
| ८.४ | प्रकरणांची  प्रकार पर्याय वापरुन प्रकरणांची  स्थिती पहाणे | २८ |
| ८.५ | पक्षकार  पर्याय वापरुन प्रकरणांची  स्थिती पहाणे | २९ |
| ८.६ | एफआयआर क्रमांक वापरुन शोध | ३० |
| ८.७ | कायद्यानुसार शोध | ३० |
| ८.८ | सावधान प़त्र | ३१ |
| ८.९ | चाचणी पूर्व चौकशी अर्ज | ३२ |
| ८.९.१ | जामिनाची स्थिती कशी जाणून घ्यावी | ३३ |

| | | |
|---|---|---|
| ८.९.२ | रिमांड स्थिती कशी जाणून घ्यावी | ३३ |
| ८.९.३ | पूर्व चौकशी अर्ज स्थिती कशी जाणून घ्यावी | ३४ |
| ९. | ई–कोर्टस् मोबाईल ॲपव्दारे वाद सूची मिळविणे | ३५ |
| १०. | माझ्या प्रकरणांचा  पर्याय | ३६ |
| १०.१ | माझ्या प्रकरणांमध्ये प्रकरणे कशी जोडावीत | ३६ |
| १०.२ | माझ्या प्रकरणांमधून प्रकरणे कशी काढायची | ३७ |
| १०.३ | माझ्या प्रकरणांमध्ये शोध | ३७ |
| १०.४ | रिफ्रेश बटण | ३८ |
| १०.५ | माझ्या प्रकरणांचा दिनांक/जिल्हा वार प्रदर्शन पर्याय | ३८ |
| १०.६ | कॅलेंडर | ३९ |
| ११. | बॅकअप सुविधा | ३९ |
| ११.१ | निर्यात पर्याय | ४१ |
| ११.२ | आयात पर्याय | ४२ |
| १२ | क्यूआर कोड वापरुन प्रकरणांची स्थिती मिळविणे | ४३ |
| १२.१ | टप्पा  1 : आपल्या प्रकरणांचा  QR कोड मिळविणे | ४३ |
| १२.२ | टप्पा २  :  क्यूआर कोडचे प्रिंटआउट घेणे आणि केस डॉकेटमध्ये चिटकवणे | ४४ |
| १२.३ | टप्पा  3  : क्यूआर कोड स्कॅन करा | ४४ |
| १३. | जेथे इंटरनेट नाही तेथे एसएमएसद्वारे प्रकरणांची स्थिती मिळविणे | ४४ |
| १४. | ई कोर्टस्  स्वयंचलित ईमेल सेवांद्वारे प्रकरणांची स्थिती मिळविणे | ४५ |
| १५ | कोर्ट कॉम्प्लेक्स लोकेटर | ४६ |
| १६. | ई कोर्टस्  मोबाइल ॲप मधील विविध दुवे | ४७ |
| १७. | ई कोर्टस् मोबाइल ॲप मधील ई – पे लिंक | ४७ |
| १८ | ई कोर्टस्  मोबाइल ॲपमध्ये एनजेडीजी लिंक | ४८ |
| १९ | ई कोर्टस्  मोबाइल ॲपव्दारे इंडिया कोड प्रवेश | ५० |
| १९.१ | इंडिया कोडमधून बेअर ॲक्टस् शोधणे आहेत | ५० |

| | | |
|---|---|---|
| २० | ई–कोर्टस् मोबाइल ॲपव्दारे ई–फाईलिंग दुवा | ५१ |
| २१ | ई कोर्टस् मोबाइल ॲपव्दारे आभासी न्यायालये दुवा | ५१ |
| २२ | ई कोर्टस् मोबाइल ॲपमध्ये वकिलांच्या फॉर्मस् करीता लिंक . | ५२ |
| २३ | मदत पर्याय | ५३ |

# “ई-कोर्ट सेवा”

## मोबाईल ॲप्लिकेशन

तुमच्या केसची स्थिती तुमच्या हाती आहे हे तुम्ही कधी पाहिले आहे का तेदेखील २४×७ तास . ई–कोर्ट सेवा मोबाईल ॲपद्वारे हे स्वप्न सत्यात उतरले आहे. आता कोणालाही संबंधित कोर्ट कॉम्प्लेक्समध्ये प्रत्यक्षात न जाता त्यांच्या मोबाईल फोनद्वारे केसची स्थिती, कोर्टाचे आदेश, कारण यादी मिळू शकते. ई–समीती, सर्वोच्च न्यायालय ऑफ इंडियाने "ई–कोर्ट सेवा” या नावाने फिर्यादी, वकील, कायदे संस्था, पोलिस, सरकारी संस्था आणि इतर संस्थात्मक पक्षकारांच्या हितासाठी मोबाइल अनुप्रयोग जारी केला आहे.

मोबाईल ॲप्लिकेशन सीएनआर नंबर, केस नंबर प्रमाणे केसची स्थीती पाहणे , फाइलिंग नंबर, पक्षकारांची नावे, एफआयआर नंबर, वकिलांचा तपशील, कायदे, केस प्रकार यासारख्या पर्यायांसह येतात. आपण ई–कोर्टाच्या मोबाईल ॲपच्या माध्यमातून केसचा इतिहास, एखाद्या प्रकरणाची डायरी, दैनंदिन प्रकरण वादसूची, खटल्याचे हस्तांतरण तपशील, आदेश आणि निवाडा देखील विनामूल्य पाहू शकता. आपण ॲंड्रॉईड फोनसाठी इतर अनुप्रयोगाप्रमाणे गूगल प्ले स्टोर वर आणि आयफोन आणि आय पॅड डिव्हाइससाठी ॲपल ॲप स्टोअर वरून हे ॲप्लीकेशन डाउनलोड करू शकता. आपण हे ॲप्लीकेशन अधिकृत ई–समितीच्या वेबसाइट https://ecommitteesci.gov.in वर प्रदान केलेल्या डाउनलोड लिंक वरुन देखील डाऊनलोड करू शकता.

ई कोर्ट मोबाइल ॲप अंतर्गत सर्व ई कोर्ट सेवा ई कोर्ट मोबाइल ॲप मधील एका अतिरिक्त फायदयासह उपलब्ध आहेत. जसे की ते त्यामध्ये उपलब्ध असलेला 'माझी प्रकरणे' हा पर्याय वापरुन कस्टमाईझ करु शकतो आणि सदर ॲप हे वकिल किंवा पक्षकार यांच्यासाठी डिजिटल डायरीसारखा आहे. 'माझे प्रकरण' पर्याय वापरुन आपण आपली वैयक्तिक केस तिच्या नंबराप्रमाणे जोडू शकता आणि त्याकेसची स्वयंचलित अद्यतने मिळवू शकता. हे ॲप्लीकेशन पक्षकार, कंपन्या, संस्था ज्यांची वेगवेगळ्या ठिकाणी वेगवेगळ्या न्यायालयात अनेक प्रकरणे आहेत त्यांना त्याचा उपयोग होउ शकतो. 'माझ्या खटल्यांमध्ये' एखादी व्यक्ती त्याच्या वैयक्तिक प्रकरणांची यादी जोडू शकते आणि ई–कोर्ट मोबाइल

अनुप्रयोगाद्वारे सर्व अद्यतने मिळवू शकेल. ई–कोर्ट सेवा मोबाईल ॲपवर सर्व प्रकरणातील तपशील असलेली आपली वैयक्तिक डिजिटल केस डायरी आपल्या हातात उपलब्ध आहे (सेट) ती पण २४×७ विनामूल्य, यात कोणतीही शंका नाही.

**१. "ई–कोर्ट सेवा" मोबाइल ॲप कसे स्थापित करावे:**


१.१ ई–कोर्ट वेबसाइट वरून डाउनलोड करा.

१.२. गूगल स्टोअर / ॲपल स्टोअर वरून डाउनलोड करा.

**१.१. ई–कोर्ट वेबसाइट https: //ecourts.gov.in ई–कोर्ट्स वरून डाउनलोड करा.**

आपण गूगल प्ले स्टोअर/ॲपल आयटयून्स स्टोअर वरून नवीन "ई कोर्ट" मोबाइल ॲप डाउनलोड करु शकता. ई कोर्ट संकेतस्थळ ई कोर्ट सेवा मोबाइल ॲप गुगल प्ले स्टोअर/ॲपल आयटयून्स च्या माध्यमातून शॉर्टकट दूवा देखील प्रदान करते. या लिंकद्वारा आपण संबंधित मोबाईल ॲप प्ले स्टोअर वरुन डाउनलोड करु शकता. ई–कोर्ट्स वेब पृष्ठामध्ये प्रदान केलेला मोबाइल ॲप डाउनलोड लिंक स्क्रीनशॉट म्हणून खाली दर्शविला गेली आहे. स्थापना पूर्ण झाल्यावर, आपल्याला ॲप मधील "ओपन" पर्याय निवडून ॲप उघडावे लागेल व त्यानंतर ॲप उघडेल आणि ई–कोर्ट ॲप्सची 'स्वागत स्क्रीन' दिसून येईल, जी येथे स्क्रीनशॉटमध्ये दर्शविली आहे.







<u>१.२ तुमच्याकडे अँड्रॉइड स्मार्टफोन असल्यास गुगल प्ले स्टोअर वरून डाउनलोड करा.</u>

आपल्याकडे अँड्रॉईड स्मार्ट फोन असलयास ई कोर्ट सेवा मोबाइल अॅपसाठी गूगल प्ले स्टोअर शोधा आणि डाउनलोड क्लिक करा आणि नंतर डाउनलोड क्लिक नंतर इन्स्टॉल करा त्यानंतर तुमच्या मोबाइल स्मार्टफोनमध्यो मोबाइल अॅप स्थापित केला जाईल.

<u>१.३ आयफोन / आयपॅड साठी थेट अॅपल स्टोअर वरून थेट डाउनलोड करा.</u>

जर तुमच्याकडे अॅपल आयफोन असेल तर 'ई कोर्ट सेवा मोबईल अॅप' साठी अॅपल स्टोअर शोधा आणि डाउनलोड क्लिक करा आणि डाउनलोड नंतर इन्स्टॉल क्लिक करा. त्यानंतर आपल्या अॅपल आयफोनमध्ये मोबाइल अनुप्रयोग स्थापित केला जातो. त्याचप्रमाणे ई न्यायालय सेवांसाठी मोबाइल अॅप हे आयपॅड करीतादेखील उपलब्ध आहे जे डाउनलोड आणि स्थापित केले जाऊ शकते.




२. ई – कोर्ट ॲप कॉन्फिगर करा.




ई कोर्टाचे मोबाइल ॲपची सध्याची आवृत्ती तीन आस्थापना प्रकारांची सेवा पुरवते **(अ)**हायकोर्ट **(ब)**जिल्हा कोर्ट **(क) दोन्ही**. ई–कोर्ट मोबाइल ॲपमध्ये आपण जिल्हा न्यायालय किंवा उच्च न्यायालय किंवा दोन्ही न्यायालयांमधील प्रकरणांचा तपशील पाहण्याकरीता आपल्याला मेनू सूचीमधून कॉन्फिगर पर्याय निवडण्याची आवश्यकता आहे. आपण रेडिओ बटन "उच्च न्यायालय" वर क्लिक करुन उच्च न्यायालयाच्या सेवांमध्ये प्रवेश करण्यासाठी आपले मोबाइल ॲप कॉन्फिगर करु शकता. आपण रेडिओ बटन "जिल्हा न्यायालय" वर क्लिक करुन जिल्हा कोर्टाच्या सेवांमध्ये प्रवेश करण्यासाठी आपले मोबाइल ॲप कॉन्फिगर

करु शकता.आणि जर तुम्हाला हायकोर्ट व जिल्हा कोर्टाच्या दोन्ही सेवांमध्ये प्रवेश करायचा असेल तर तुम्ही रेडिओ बटण "दोन्ही"क्लिक करु शकता.




## ३. सहा भारतीय भाषांमध्ये ई–कोर्ट मोबाइल ॲप:




ई–कोर्ट मोबाइल ॲपची नवीनतम आवृत्ती ज्याची चाचणी सुरु आहे ती, इंग्रजी व सहा प्रादेशिक भाषांमध्ये उपलब्ध केली जाईल. नियमित वापरकर्त्यांची उत्सुकता वाढविण्यासाठी सहा प्रादेशिक भाषांमधील ई–कोर्ट ॲपचे स्क्रीनशॉट्स जोडले गेले आहेत.


- हिंदी कन्नड
- मराठी गुजराती
- तमिल तेलुगु




## ४. ई–कोर्ट सेवा मोबाईल ॲपची मूलभूत चिन्हे माहित असणे आवश्यक आहे.

| | |
|---|---|
| **४.१ स्वागत पृष्ठ**<br><br>आपण मोबाइल ॲपमध्ये प्रवेश केल्यास हे स्वागत पृष्ठ प्रदर्शित होईल |  |
| ४.२ मेनू यादी चिन्ह<br>आपण ☰ तीन लाइन चिन्हावर क्लिक केल्यास ते ई–कोर्ट मोबाइल ॲपची संपूर्ण मेनू यादी दर्शवेल. ईपे, एनजेडीजी, इ फायलिंग, इंडिया कोड, ॲडव्होकेटचे प्रकार, आभासी न्यायालये अशा विविध ई–कोर्ट सेवेचे महत्त्वाचे दुवे आता मेनू अंतर्गत उपलब्ध आहेत. |  |
| **४.३ जिल्हा न्यायालय / हायकोर्ट प्रकरणाचा तपशील:**<br><br>आपण जिल्हा कोर्टाच्या खटल्यासाठी किंवा उच्च न्यायालय किंवा दोन्ही जिल्हा न्यायालय आणि उच्च न्यायालयांसाठी मोबाइल ॲप कॉन्फिगर करू शकता. |  |
| **४.४ मुख्य मेनू पर्याय :**<br><br>i.सी.एन.आर. शोध, ii. केस स्थिती (शोध); iii. वादसूची iv. माझे केस पर्याय. |  |

| | |
|---|---|
| **४.५ सी.एन.आर. शोधणे –**<br>तुम्ही सी.एन.आर.चिन्हाचा वापर करून सी.एन.आर. क्रमांक वापरून प्रकरणाची सद्यस्थिती बघू शकता. |  |
| **४.६ प्रकरणाची सद्यस्थिती शोधणे –**<br>प्रकरणाची सद्यस्थिती हा पर्याय वापरून एखादी व्यक्ती खाली नमूद नऊ शोध पर्यायांचा वापर करून प्रकरणाची सद्यस्थिती बघू शकते.<br>प्रकरण क्रमांक पक्षकाराचे नाव<br>दाखल क्रमांक प्रथम खबरी अहवाल<br>वकील कायदा<br>प्रकरण प्रकार कॅव्हेट<br>न्यायचौकशी पूर्व प्रकरणे |  |
| **४.७ वादसूची –**<br>या पर्यायाचा वापर करून एखाद्या व्यक्तीस कोणत्याही न्यायालयाची वादसूची बघता येईल. |  |
| **४.८ माझी प्रकरणे –**<br>तुम्ही 'माझी प्रकरणे' या पर्यायांतर्गत तुमच्या व्यक्तिगत प्रकरणांची यादी जतन करू शकता. |  |

| | |
|---|---|
| **४.९ तारीखनिहाय / जिल्हानिहाय माझी प्रकरणे –**<br>माझी प्रकरणे हा पर्याय दोन प्रकारे दर्शविला जातो दिनांकनिहाय / जिल्हानिहाय. तुम्ही तुम्हाला हवा तो दर्शवलेला प्रकार निवडू शकता. |  |
| **४.१० दिनदर्शिका विकल्प –**<br>दिनदर्शिका विकल्प हा प्रकरणे दिनदर्शिका स्वरूपात दर्शवतो. |  |
| **४.११ रिफ्रेश बटन –**<br>या बटणावर क्लिक केल्यानंतर ते संपूर्ण डेटा अद्यावत करेल. |  |
| **४.१२ माय केसेस अंतर्गत सर्च पर्याय –**<br>माय केसेस अंतर्गत सर्च बॉक्स मुळे तुम्हाला माय केसेस यादीत शोधण्यास मदत होते. |  |
| **४.१३ क्यू.आर.कोड –**<br>प्रत्येक प्रकरणासाठी मोबाईल ॲप मधील प्रकरणाचा इतिहास अंतर्गत विशिष्ट प्रकरणा करता क्यू.आर.कोड उपलब्ध आहे. त्याची प्रत काढता येते आणि ती केस डॉकेट वर चिकटवता येऊ शकते. |  |
| **४.१४ स्कॅन क्यू.आर.कोड –**<br>विशिष्ट प्रकरणाची स्थिती जाणून घेण्याकरिता मोबाईल ॲपमध्ये अंतर्भूत असलेला स्कॅन |  |

क्यू.आर.कोड हा पर्याय वापरून केस बंडलमध्ये चिकटवलेला क्यू.आर.कोड सहजरीत्या स्कॅन करता येतो.

**४.१५ आय.ए. तपशील –**

संबंधित न्यायालयाने नोंद घेतली असल्यास एखादी व्यक्ती प्रकरणाच्या इतिहास अंतर्गत आय.ए. तपशील मिळवू शकते.

IA Details

| IA Number | Party | Date of Filing | Next Date | IA Status |
|---|---|---|---|---|
| IA/1/2019 | XXXXXXX XXXXXXX | 24-01-2019 | 28-05-2020 | Pending |

**४.१६ वर्ग तपशील –**

मोबाइल ॲप द्वारे एखादी व्यक्ती एका न्यायालयातून दुस–या न्यायालयात वर्ग झालेल्या प्रकरणाचा तपशील मिळवू शकते.

Case Transfer Details Between The Courts

| Transfer Date | From Court No. and Judge | To Court No. and Judge |
|---|---|---|
| 17-07-2018 | 15 - District Judge-13 and Addl Sessions Judge Abad | 21 - Adhoc District Judge-5 Asst Sessions Judge Abad |

**४.१७ दुय्यम न्यायालयांची माहिती –**

अपील प्रकरणांच्या बाबतीत दुय्यम न्यायालयांची माहिती उपलब्ध आहे.

Subordinate Court Information

Subordinate Court Information

| | |
|---|---|
| Court No. and Name | 5th Jt. Civil Judge J.D. J.M.F.C. Aurangabad |
| Case No. and Year | - 0000353 - 2014 |
| Case Decision Date | 14-11-2016 |

**४.१८ प्रकरणाचा इतिहास –**

प्रकरणाचा इतिहास या पर्याया अंतर्गत एखाद्यास खालील शीर्षाखाली एखाद्या प्रकरणाची संपूर्ण माहिती मिळू शकते.

१. प्रकरण तपशील

२. प्रकरण सद्यस्थिती

३. क्यू.आर.कोड

४.याचिकाकर्ता आणि वकील

५. प्रतिवादी आणि वकील

६. कायदे

७.प्रकरण सुनावणीचा इतिहास

८ अंतिम आदेश किंवा न्याय निर्णय



# ५. इ–न्यायालये सेवा मोबाइल ॲप्लीकेशन द्वारे प्रकरणाचा पूर्ण इतिहास मिळवा –



## ६. प्रकरण शोधण्याचा पर्याय –

इ – न्यायालये मोबाईल ॲप अंतर्गत दोन मुख्य शोध मेनू आहेत –

१. सीएनआर शोध

२. प्रकरण स्थिती शोध

आता आपण ते अनूक्रमे खालील प्रमाणे पाहू.

## ७. सी.एन.आर. क्रमांक वापरुन प्रकरण शोधणे




मोबाईल ॲपचा वापर करून आपल्या फोन मध्ये प्रकरणाचा तपशील मिळवण्यासाठी सी.एन.आर. क्रमांक वापरुन प्रकरण शोधणे हा सर्वात जलद पर्याय आहे. तुम्हाला सी.एन.आर क्रमांक काय आहे हे जाणुन घ्यायचे असेल तर कृपया पुढे वाचत राहा.

## ७.१. सी.एन.आर क्रमांक म्हणजे काय

सी.एन.आर. म्हणजे प्रकरण क्रमांक अभिलेख (केस नंबर रेकॉर्ड) हा सर्व प्रकरणांना दिलेला एक विशिष्ट १६ अंकी क्रमांक आहे. थोडक्यात हा एक विशिष्ट प्रकरण ओळख दर्शवणारा क्रमांक आहे, ज्याद्वारे कोणतेही प्रकरण ओळखता (शोधता) येते. प्रकरण माहिती प्रणालीद्वारे प्रत्येक दाखल केलेल्या प्रकरणास सीएनआर क्रमांक दिला जातो. हा अगदी रेल्वे तिकीट साठी वापरल्या जाणाऱ्या पीएनआर क्रमांक प्रमाणे आहे. सी एन आर क्रमांकासह जो विशिष्ट 16 अंकी क्रमांक आहे, कोणीही उच्च न्यायालय आणि जिल्हा न्यायालय मधील आपले प्रकरण शोधू शकतो.

| | |
|---|---|
| सी.एन.आर (१६ अंकी) मध्ये (राज्य सांकेतांक) (जिल्हा सांकेतांक) (आस्थापना सांकेतांक) (प्रकरण दाखल क्रमांक) (दाखल वर्ष) | **(जेके) (एएन) (०१) (०००६३८) (२०१७)** |

विविध जिल्हयातील सी.एन.आर क्रमांकाचे उदाहरण व्यवस्थीत समजण्याकरिता पुढीलप्रमाणे दिले आहे.

| CNR Number | PBJL01-015294-2016 | MLSH04-000548-2017 | TNSA06-000398-2017 |
|---|---|---|---|
| State code (2 digits) | PB (Punjab) | ML (Megalaya ) | TN (Tamil Nadu) |
| District Code (2 digits) | JL (Jalandar) | SH (East Khasi district) | SA (Salem district) |
| Establishment Code (2 digits) | (01) (District and sessionscourt Establishment) | 04 (Chief Judicial Magistrate Establishment) | 05 (Principal District Munsif Establishment) |
| Case filing number (6 digits) | 014824 (Case number) | 000548 (Case Number) | 000470 (Case Number) |
| Filing year (4 digits) | 2015 (Filing Year) | 2017 (Filing Year) | 2017 (Filing Year) |
| Total (16digit) (State code) (District code) (Establishment code) (Case filing number) (Filing year) | (PB)(JL)(01) (014824)(2015) (Total 16 digits) | (ML)(SH)(04) (000548)(2017) (Total 16 digits) | (TN)(SA)(05) (000470)(2017) (Total 16 digits) |

७.२ तुमचा सीएनआर क्रमांक कसा माहित करुन घ्याल :

पक्षकार / वकील किंवा इतर कोणीही प्रत्येक खटल्यात सी.एन.आर. दोन प्रकारे मिळवू शकतात.

**(१)** ई न्यायालय सेवा मोबाईल ॲप वरून

**(२)** ई न्यायालय सेवा वेबसाइट दुव्यावरून

७.३ ई-कोर्ट मोबाइल ॲप वरून सीएनआर क्रमांक कसा मिळवायचा:

सीएनआर क्रमांक मिळविण्यासाठी आपल्याकडे जिल्हा न्यायालयाचे नाव आणि कोणताही एक तपशील जसे की प्रकरण क्रमांक किंवा दाखल क्रमांक किंवा पक्षकारांचे नाव इत्यादी माहिती असावी. आपण खटला क्रमांक वापरुन ई-कोर्ट मोबाईल ॲप वरून सीएनआर क्रमांक कसा मिळवायचा याची टप्पा टप्प्याची प्रक्रिया पाहूया. उदाहरण : दुय्यम कोर्ट, अविनाशी, तिरुप्पूर जिल्हा, तामिळनाडूचा ओएस ५०/२०१७ चा सीएनआर क्रमांक कसा शोधायचा.




कृती **1** : ई कोर्ट सेवा मोबाइल ॲपवर जा.

कृती २ : मुख्य मेनूमधून प्रकरण स्थिती निवडा.

कृती ३:

- प्रकरण स्थिती क्लिक करा.
- राज्य जिल्हा निवडा.
- प्रकरण क्रमांक पर्याय निवडा.
- प्रकरण प्रकार निवडा.
- प्रकरण क्रमांक आणि वर्ष प्रविष्ट करा.
- जा क्लिक करा.
- कोर्टाच्या नावावर क्लिक करा आणि नंतर खटल्याचा तपशील येईल.
- प्रकरण क्रमांकावर क्लिक करा (ओएस / ५० / २०१७) सीएनआर क्रमांकासह प्रकरण तपशील आढळतील.







७.४ सीएनआर क्रमांक वापरुन प्रकरणे कशी शोधायची

आता सीएनआर क्रमांक वापरुन प्रकरण स्थिती कशी शोधायची ते पाहू.

कृती १: मोबाइल ॲपवर सीएनआर चिन्हावर क्लिक करा


कृती २: सीएनआर क्रमांक प्रविष्ट करा

कृती ३: शोध बटणावर क्लिक करा

कृती ४: प्रकरण इतिहास. प्रकरण तपशील. प्रकरण स्थिती. याचिकाकर्ता व वकिलांचा तपशील. उत्तरवादी व वकिलांचा तपशील. अधिनियम तपशील. प्र.ख.अ. तपशील. खटल्याच्या सुनावणीचा इतिहास. अंतिम आदेश/न्यायनिर्णय दाखवतो.

कृती **5**: "प्रकरण तपशील" शीर्षक क्लिक करा.

कृती **6**: ते सीएनआर क्रमांकासह  प्रकरण तपशील दर्शवेल
(कृती 1 ते 6 स्क्रीनशॉट तयार संदर्भासह येथे दर्शविले आहेत)



<u>८. विविध पर्यायांचा वापर करून प्रकरणांची स्थिती शोधा.</u>

आपल्या प्रकरणाची स्थिती सात ज्ञात पर्यायांसह शोधा

१) प्रकरण क्रमांक

२) दाखल क्रमांक

३) वकील

४) प्रकरणाचा प्रकार


५) पक्षकाराचे नाव

६) प्रथम खबरी अहवाल क्रमांक

७) अधिनियम

८) न्यायचौकशी पूर्व अर्ज

९) सावधान पत्र




| |
|---|
| मोबाइल ॲपवर प्रकरण स्थिती पर्याय क्लिक करा --- राज्य जिल्हा निवडा --- कोणत्याही एका पर्यायावर क्लिक करा --- त्या पर्यायाचा फॉर्म उघडला जाईल --- तपशील भरा ---- प्रकरणांची यादी दर्शविली जाईल - प्रकरण क्रमांक क्लिक केल्यास तो प्रकरणाच्या इतिहासामध्ये आणखी विस्तार करेल -----शीर्षकावर क्लिक करा जे तपशील आणखी पुढे उघडेल. |

## ८.१ प्रकरण क्रमांक पर्याय वापरुन प्रकरणाची स्थिती पाहणे




आता प्रकरण स्थिती अंतर्गत पहिला पर्याय पाहूया म्हणजे मोबाईल ॲप्लिकेशनच्या 'ई-न्यायालय सेवा' प्रकरण क्रमांक पर्याय वापरुन.

कृती १: मेनूमधून प्रकरण स्थिती  वर क्लिक करा

कृती २: राज्य आणि जिल्हा निवडा.

कृती 3 : प्रकरण क्रमांक पर्यायावर क्लिक करा.

प्रकरण क्रमांक पर्यायावर क्लिक केल्यावर येथे दर्शविल्याप्रमाणे फॉर्म उघडेल आणि तपशील भरा

- न्यायालय संकुल
- प्रकरण प्रकार
- प्रकरण क्रमांक
- वर्ष




कृती  ४ : तपशील दाखल केल्यानंतर जा क्लिक करा.

कृती ५ : प्रकरणांची एकूण संख्या  न्यायालया- निहाय दाखविली जाते आणि क्लिक केल्यास प्रकरण क्रमांक उघडेल.

कृती ६ : जर आपण प्रकरण क्रमांकावर क्लिक केले तर ते प्रकरणाचा पुढील इतिहास, १) प्रकरण तपशील (२)प्रकरणाची स्थिती (३) याचिकाकर्ता आणि वकिल (४) उत्तरवादी आणि वकिल (५) अधिनियम (६) प्र.ख.अ. तपशील ( 7) दुय्यम न्यायालयाची माहिती (8)प्रकरण सुनावणीचा इतिहास (9) अंतरिम आदेश (10) अंतिम आदेश/न्याय निर्णय यासह उघडेल.


(प्रत्येक वेळी प्रकरण स्थिती पर्याय वापरताना राज्य, जिल्हा निवडला असल्याचे सुनिश्चित करा)

८.२ दाखल क्रमांक पर्यायाचा वापर करून प्रकरणाची स्थिती पाहणे:

प्रकरण स्थितीमध्ये उपलब्ध असलेला दुसरा पर्याय म्हणजे दाखल क्रमांक वापरुन

**दाखल क्रमांकाने कसे शोधायचे**

- प्रकरणस्थिती पर्यायावर क्लिक करा.
- राज्य, जिल्हा निवडा
- दाखल क्रमांक पर्यायावर क्लिक करा.
- कोर्ट कॉम्प्लेक्स ड्रॉप बॉक्स निवडा.
- दाखल क्रमांक, वर्ष भरा.
- जा क्लिक करा
- एकूण प्रकरणांच्या संख्येवर क्लिक करा
- प्रकरण क्रमांकावर क्लिक करा.
- प्रकरणाचा इतिहास उघडेल आणि प्रत्येक मथळ्यावर क्लिक केल्यास ते अधिक तपशील उघडेल.




८.३ ॲडव्होकेट पर्यायाचा उपयोग करून प्रकरणाची स्थिती पाहणे

हा शोध पर्याय कोणत्याही वकिलासाठी डिजिटल लिपिक असतो कारण तो एखाद्या लिपीकाची बहुतेक कामे करतो. उदाहरणार्थ, हा पर्याय दर्शवेल की वकिलांच्या नावे सर्व न्यायालयात किती प्रकरणे प्रलंबित आहेत, कोणत्या विशिष्ट तारखेला कोणती प्रकरणे सूचीबद्ध आहेत आणि २४ *७ त्यांच्या हँडसेट मधील प्रकरणांची अवस्था काय आहे. वकील हा शोध पर्याय खालील तीन पर्यायांतर्गत वापरू शकतो (१) वकिलाचे नाव वापरुन शोध (२) बारकोड क्रमांक वापरुन शोध (३) दिनांक प्रकरण सूचीचा वापर करून विशिष्ट दिवशी सूचीबध्द प्रकरणाचा एखादया विशिष्ट वकीलाच्या प्रकरणांचा शोध.


८.३.१ वकिलाच्या नावानुसार शोध

जर एखादया वकिलांना त्यांच्या नावावर किती खटले प्रलंबित आहेत किंवा निकाली झाले आहेत हे जाणून घ्यावयाचे असल्यास हा पर्याय उपयोगी ठरतो.

उदाहरणार्थ : यासोबत दाखविलेल्या स्क्रीनशॉटमध्ये,वकिलाच्या नावाने शोध केला असता त्यामध्ये वकिलाचे नाव राजप्पा याकरिता तंजावूर, तामिळनाडू येथे १३ प्रकरणे प्रलंबित दर्शविते आणि जर क्रमांकावर क्लिक केले तर ते न्यायालयनिहाय किती प्रकरणे प्रलंबित आहेत ते देखील दर्शविते. जर क्रमांकावर क्लिक केले तर ते संपूर्ण सूची दाखवेल जी प्रकरण इतिहासासह विस्तारयोग्य आहे.

वकिलांच्या नावाने कसे शोधायचे


- प्रकरण स्थिती क्लिक करा
- राज्य जिल्हा निवडा
- ॲडव्होकेट पर्यायावर क्लिक करा
- रेडिओ बटण निवडा
  वकिलाचे नाव
- जा क्लिक करा
- दर्शविलेल्या प्रत्येक आस्थापनेच्या प्रकरणांच्या संख्येवर क्लिक करा
- प्रकरण क्रमांक क्लिक केल्यास प्रकरणाचा इतिहास उघडेल.



८.३.२ बारकोड वापरून शोध

कोणतेही वकील त्यांचा बारकोड वापरुन त्याची प्रकरणे आणि वाद सूची शोधू शकतात. ते जिल्ह्यातील सर्व आस्थापनांसाठी प्रलंबित आणि निकाली काढलेली अशी दोन्ही प्रकारची एकूण प्रकरणे प्रदर्शित करेल.


दिनांक वादसूचीच्या दुस-या पर्यायात बारकोडचा वापर करुन, वकिलांना त्याची वाद सूचीसुद्धा मिळू शकते जी पुढील परिच्छेदामध्ये स्पष्ट केली आहे. या टप्प्यावर हे दाखविणे अत्यंत महत्वाचे आहे की, बारकोड वकिलांसाठी एक विशिष्ट ओळख क्रमांक आहे आणि तो डेटाबेसमध्ये योग्यरित्या प्रविष्ट केला जाणे आवश्यक आहे. जर एखाद्या वकिलांना असे आढळून आले की त्याचा बारकोड मोबाईल ॲपमध्ये योग्य प्रकारे प्रतिबिंबित झाला नसेल तर कृपया बारकोड अचूकपणे प्रविष्ट करण्यासाठी आपण कोठे नोंदणी केली आहे ते कृपया संबंधित न्यायालयाला कळवा.




<u>उदाहरण:</u>

महाराष्ट्र ॲडव्होकेट कोड सर्च मध्ये वकील अग्रवाल के डी यांच्या नावे एकूण ७७८ प्रकरणे दाखवली जातात.

**८.३.३. दिनांक प्रकरण सूची (वकील वाद सूची) वापरून शोध**





जर वकिलांना त्याचे नाव निहाय वाद सूची जाणून घ्यायची असेल म्हणजेच त्याच्या नावे कोणत्याही विशिष्ट तारखेला न्यायालयात किती प्रकरणे येत आहेत तर या दिनांक वाद सूचीचा उपयोग केला जाऊ शकतो आणि वकिली वाद सूची तयार केली जाऊ शकते. वकील वाद सूचीतील फायदा म्हणजे तो खटल्याच्या टप्प्यासह एका विशिष्ट तारखेला सूचीबद्ध केलेली प्रकरणे दर्शवेल.


वकिलासाठी तारीखवार निहाय वादसूची कशी शोधावी

- दिनांक प्रकरण सूची मिळविण्यासाठी प्रकरण स्थितीवर क्लिक करा (वकिलांची वाद सूची)
- दिनांक प्रकरण सूची येथे क्लिक करा
- नंतर बार कोड प्रविष्ट करा
- नंतर तारीख निवडा
- जा क्लिक करा
- एकूण प्रकरणांची संख्या क्लिक करा
- नंतर वकील वाद सूची दर्शविली जाईल.

## ८.४ प्रकरण प्रकार विकल्पाचा वापर करुन प्रकरणाची सदयस्थिती बघणे.

जर एखादया व्यक्तिला प्रकरणाचा प्रकार शोधावयाचा असल्यास उदा. 'अपील', प्रकरणे तेव्हा हा विकल्प वापरला पाहिजे. एखादया व्यक्तिस, कोणताही प्रकरण प्रकार निवडून प्रकरण परत्वे यादी मिळू शकेल.उदाहरणः खाली नमूद केलेल्या स्क्रीनशॉट मध्ये "अपीले" हा प्रकरण प्रकार निवडलेला आहे आणि म्हणून अपील मुकदमे (ए.एस.) यादीमध्ये दाखविले आहेत.







Sub Court,Avinashi : 49

| Sr.No | Case Number | Party Name |
|---|---|---|
| 1 | AS/57/2018 | Rajan nagar welfare Society vs SUBRAMANIAM |
| 2 | AS/56/2018 | Chinnasamy vs Deivasigamani(Died) |
| 3 | AS/55/2018 | Ramasamy gounder (DIED) vs Karuppa gounder (DIED) |
| 4 | AS/54/2018 | Kesavamorthy vs Ruckmani |
| 5 | AS/53/2018 | Poovathal vs Kumarasamy gounder |

## ८.५ पक्षकार विकल्पाचा वापर करुन केस स्थिती पहाणे.


केस स्थिती क्लिक करा
---> राज्य जिल्हा निवडा
---> पक्षकार पर्याय क्लिक करा
---> कोर्ट कॉम्प्लेक्स निवडा
---> याचिकाकर्ता/ उत्तरवादी नाव निवडा
---> वर्ष भरा
---> प्रलंबित/निकाली/ दोन्ही रेडिओ बटण निवडा
---> पुढे जा वर क्लिक करा
---> प्रकरणांच्या संख्येवर क्लिक करा
---> पक्षकाराच्या नावासहीत केस नंबर दर्शविला जातो.
---> आवश्यक केस नंबरवर क्लिक करा.
---> प्रकरणाचा इतिहास दाखविला जाईल




एखादया व्यक्तिला 'पक्षकार' हा विकल्प वापरुन प्रकरणे शोधता येतील उदाहरणार्थ. एखाद्यास रंगास्वामी नावाचे काही प्रकरण आहे की नाही हे जाणून घ्यायचे असेल तर, खाली दर्शविलेल्या पाय–यांचे अनुसरण करा आणि नावांसह प्रकरणांचा शोध घ्या आणि मग रंगास्वामी नावाची प्रकरणे दाखविली जातील जी खाली स्क्रीनशॉटमध्ये दर्शविली आहेत


## ८.६ प्र.ख.अ. क्रमांक वापरुन शोध

- प्रकरण स्थिती क्लिक करा
- राज्य, जिल्हा निवडा
- प्र.ख.अ. क्रमांक पर्यायावर क्लिक करा
- न्यायालय संकुल निवडा
- पोलिस ठाणे निवडा
- प्र.ख.अ. क्रमांक आणि वर्ष प्रविष्ट करा
- रेडिओ बटण निवडा
- प्रलंबित / निकाली / दोन्ही
- जा क्लिक करा
- प्रदर्शित क्रमांकावर क्लिक करा
- **प्रकरण क्रमांकावर क्लिक करा ते प्रकरणाचा इतिहास** पुढे उघडेल**.**




## ८.७ कायद्याच्या आधारे शोधा


- केस स्थिती क्लिक करा
- राज्य, जिल्हा निवडा
- कायदा विकल्पावर क्लिक करा
- कोर्ट कॉम्प्लेक्स निवडा
- कायदा शोधा
- कायदा प्रकार निवडा
- विभाग प्रविष्ट करा – प्रलंबित / निकाली निघालेल्या केसेससाठी रेडिओ बटण निवडा – पुढे जा वर क्लिक करा – त्यानंतर कायदा प्रकारातील केस प्रदर्शित होईल.




## ८.८ कॅव्हिएट

कॅव्हिएट शोध हा बहुतेक वेळा शोधल्या जाणाऱ्या पर्यायांपैकी एक आहे. जेव्हा जेव्हा एखाद्याला हे जाणून घ्यायचे असेल की एखादे कॅव्हिएट व्यक्तीच्या किंवा मालमत्तेच्या विरोधात विशिष्ट कोर्टामध्ये प्रलंबित आहे की नाही तर ते हा कॅव्हिएट शोध पर्याय वापरू शकतात.

कॅव्हेट कसा शोधायचा: प्रकरण स्थितीवर क्लिक करा -> राज्य, जिल्हा निवडा – क्लिक कॅव्हिएट पर्यायावर क्लिक करा – कोर्ट कॉम्प्लेक्स निवडा – शोध प्रकार निवडा – कॅव्हिएटरचे नाव प्रविष्ट करा – जा क्लिक करा – त्यानंतर कॅव्हिएट शोध तपशील दर्शविला जाईल – ज्यावर पुढे क्लिक केल्यानंतर संपूर्ण तपशील प्रदर्शित होईल.







## ८.९ चौकशीपूर्व अर्ज

हा पर्याय मोबाइल ॲपमध्ये सर्वात जास्त वापरलेला आणि अतिशय समाधानकारक पर्याय असेल. प्रास्ताविक पर्यायात हा पर्याय नव्हता. परंतु आम्हाला मोबाईल ॲप अंतर्गत जामीन स्थिती, रिमांडची स्थिती मिळू शकेल काय अशा बऱ्याच मागण्या होत्या.आणि आता रिमांड, जामिन यांसारखे चौकशीपूर्व अर्ज शोधण्याच्या उपयोगी पर्यायासह नवीन आवृत्ती अद्ययावत केली गेली आहे, तुम्हाला तुमच्या हँडसेटमधील माऊसच्या क्लिकवर रिमांड तपशील, जामीन ऑर्डर मिळेल याची नुसती कल्पना करा. हा एक आकर्षक पर्याय आहे. फक्त तो आपल्या मोबाइल फोनमध्ये वापरुन पहा.

### ८.९.१. जामिनाची स्थिती कशी जाणून घ्यावी

जामिनाची स्थिती कशी जाणून घ्यावी
---> प्रकरण स्थिती क्लिक करा
---> राज्य, जिल्हा निवडा
---> चौकशीपूर्व पर्यायावर क्लिक करा
---> कोर्ट कॉम्प्लेक्स निवडा
---> पोलिस स्टेशन निवडा
---> एफआयआर क्रमांक आणि वर्ष प्रविष्ट करा
---> रेडिओ बटण निवडा - जामीन
---> पुढे जा वर क्लिक करा
---> प्रकरणांची एकूण संख्या क्लिक करा
---> हे जामिनाचे तपशील दाखवतील





<u>जामीन तपशील</u>

| अ. क्र. | आरोपीचे नाव | अर्जाची तारीख् | स्थिती | पुढील/निकाली झाल्याची तारिख | निकाल |
|---|---|---|---|---|---|
| १ | जोगा सिंग | २७/०८/२०२० | निकाली झाली | २७/०८/२०२० | मान्य केला |

## ८.९.२ रिमांडची स्थिती कशी जाणून घ्यावी

जर एखाद्या व्यक्तीस ताब्यात घेण्यात आले असेल आणि त्यास रिमांड दिला असेल की नाही हे जाणून घ्यायचे असेल तर संबंधित व्यक्तीच्या कौटुंबिक वकिलासाठी हा एक अतिशय संवेदनशील शोध आहे. ते एफआयआर नंबर वापरून रिमांड स्थिती तपासू शकतात.

रिमांडची स्थिती कशी जाणून घ्यावी
---->  प्रकरण स्थिती क्लिक करा
---->  राज्य, जिल्हा निवडा
---->  चौकशीपूर्व पर्यायावर क्लिक करा
---->  कोर्ट कॉम्प्लेक्स निवडा
---->  पोलिस स्टेशन निवडा
----> एफआयआर क्रमांक आणि वर्ष प्रविष्ट करा
---->  रिमांडसाठी रेडिओ बटण निवडा -
---->  पुढे जा वर क्लिक करा
---->  प्रकरणांची एकूण संख्या क्लिक करा
---->  हे रिमांडचे तपशील दाखवते





**Remand Details**

| Sr.No | Accused Name | Type | Days | From Date |
|---|---|---|---|---|
| 1 | Kashish @ Kannu | PCR | 2 | 07/09/2020 |
| 2 | Kashish @ Kannu | MCR | 14 | 09/09/2020 |
| 3 | Kashish @ Kannu | MCR | 14 | 23/09/2020 |

## ८.९.३ पूर्व चौकशी अर्जांची स्थिती कशी जाणून घ्यावी.

चोरीच्या प्रकरणात जर मालमत्ता वसूल झाली असेल आणि मालमत्तेच्या मालकाने चौकशीपूर्व टप्प्यावर मालमत्तेच्या अंतरिम कोठडीसाठी अर्ज दाखल केला तर अशा प्रकारच्या चौकशीपूर्व अर्जाची स्थिती देखील या पर्यायाखाली तपासली जाऊ शकते. खाली दर्शविल्याप्रमाणे चौकशी पूर्व अर्जाची स्थिती शोधण्यासाठी खालील कृतींचा अवलंब करा.

चौकशीपूर्व अर्जाची स्थिती कशी जाणून घ्यावी
----> प्रकरण स्थिती क्लिक करा
----> राज्य, जिल्हा निवडा
----> चौकशीपूर्व अर्ज पर्यायावर क्लिक करा
----> कोर्ट कॉम्प्लेक्स निवडा
----> पोलिस स्टेशन निवडा
----> एफआयआर क्रमांक प्रविष्ट करा
----> वर्ष प्रविष्ट करा
----> रेडिओ बटण निवडा - जामीन
----> पुढे जा वर क्लिक करा
----> प्रकरणांची एकूण संख्या क्लिक करा
----> हे जामिनाचे तपशील दाखवते




## ९. ई–न्यायालय मोबाईल ॲपद्वारे वाद सूची मिळवणे –


मोबाईल ॲप मध्ये वादसूची मिळवणे हा वकील, पक्षकार व न्यायाधीश यांच्यासाठी तितकाच उपयुक्त पर्याय आहे. तीन प्रकारच्या वादसूची आहेत (१) कोणत्याही न्यायालयाची दिवाणी वादसूची (२) कोणत्याही न्यायालयाची फौजदारी वादसूची (३)वकील निहाय वादसूची, या वादसूची ई–न्यायालय मोबाईल ॲप अंतर्गत मिळू शकतात.

दिवाणी वादसूची आणि फौजदारी वादसूची या "वादसूची" पर्याय अंतर्गत पाहता येईल. वकील निहाय वादसूची 'प्रकरण स्थिती शोध' अंतर्गत उपलब्ध वकील पर्यायाद्वारे पाहता येईल, ज्याचे स्पष्टीकरण 'प्रकरण स्थिती पर्याय वापरुन शोध' ( सर्च युसिंग केस स्टेटस ऑप्शन )विषयाखाली केले आहे. वादसूची पर्यायचा वापर करून एखादी व्यक्ती तिचे प्रकरण विशिष्ट दिवशी सुनावणीस ठेवले आहे की नाही पाहू शकेल. न्यायाधीश, कर्मचारी, वकिलां करिता हे एक उपयुक्त वेळ व्यवस्थापन साधन आहे, ज्यायोगे एखादी व्यक्ती विशिष्ट दिवशी किती प्रकरणे सूचिबद्ध आहे हे शोधून काढू शकतो आणि त्या दिवसाकरता कार्ययोजना आखली जाऊ शकते आणि ही माहिती आता हँडसेट मधील मोबाईल ॲप द्वारा पाहता येईल.

१ वादसूची चिन्हावर क्लिक करा.
२ राज्य, जिल्हा निवडा
३ न्यायालय संकुल निवडा
४ न्यायालयाचे नाव निवडा
५ कॅलेंडरमधून वादसूची तारीख निवडा
६ दिवाणी किंवा फौजदारी क्लिक करा मग वादसूची दिवाणी फौजदारी प्रदर्शित केले आहे.
७ शोध बॉक्सचा उपयोग करून वादसूचीतील विशिष्ट प्रकरणे देखील शोधली जाऊ शकतात.



## १० माझी प्रकरणे पर्याय –




वकिलांसाठी आणि पक्षकारांसाठी 'माझी प्रकरणे' पर्याय सर्वात आकर्षक आणि उपयुक्त पर्याय आहे. कारण हा पर्याय डिजिटल वैयक्तिक केस डायरी म्हणून कार्य करतो. ई–न्यायालय ॲपमध्ये हे एक वैशिष्ट्य उपलब्ध आहे पक्षकार किंवा वकील 'माझी प्रकरणे' या पर्यायामध्ये त्यांची प्रकरणे जतन आणि संचयित करू शकतात आणि आवश्यकतेनुसार तपशील पाहू शकतात.

### १०.१ 'माझी प्रकरणे'मध्ये प्रकरणे कशी जोडावीत –




आपणास 'माझी प्रकरणे' यादीमध्ये प्रकरणे जोडावयाची असल्यास खालील कृतींचे अनुपालन करा.

**कृती १** – आपण ई न्यायालय मोबाईल ॲप वापरून 'माझी प्रकरणे' मध्ये जोडू इच्छित प्रकरण शोधा.

**कृती २** –'प्रकरणे जोडा' बटन शोधलेल्या प्रकरणातील 'प्रकरणांचा इतिहास' वरील उजव्या बाजूला स्क्रीनशॉट मध्ये दर्शविलेल्या नुसार दशर्विले जाईल.

**कृती ३** – 'प्रकरणे जोडा'बटन क्लिक करा जे 'माझी प्रकरणे' सूचीमध्ये आपल्या प्रकरणांनाा जोडेल.

वकील किंवा वकिलांचे कारकून 'माझी प्रकरणे' मध्ये त्यांच्या कार्यालयाची सर्व प्रकरणे जोडू शकतात आणि त्यांच्या कार्यालयीन प्रकरणांची डिजिटल डायरी ठेऊ शकतात आणि 'माझी प्रकरणे' हा पर्याय वापरून त्यांना प्रकरणांची सद्यस्थिती आणि स्थिती मिळु शकते. वरिष्ठ वकील स्वत: महत्त्वाची प्रकरणे जोडू शकतात आणि कनिष्ठ किंवा वकील कारकुनाच्या मदतीशिवाय प्रकरणाच्या स्थितीचा मागोवा घेऊ शकतो आणि प्रकरणाची स्थिती २४×७ पाहू शकतो. पक्षकार सुद्धा 'माझी प्रकरणे' मध्ये त्यांची प्रकरणे समाविष्ट करु शकतात.  त्याचप्रमाणे अभियोक्ता, न्यायालय पोलीस शिपाई, अन्वेषण अधिकारी, सरकारी वकील देखील "माझी प्रकरणे" ची यादी वापरू शकतात आणि त्याचा मागोवा त्यांना २४×७ घेता येऊ शकेल

## १०.२ माझी प्रकरणे म्हणून प्रकरणे कशी काढावीत –





"माझी प्रकरणे" मधून समाविष्ट केलेली प्रकरणे काढून टाकण्यासाठी, माझी प्रकरणे मधून एखादया व्यक्तिने प्रकरणे उघडावी तर ते प्रकरण 'प्रकरणे काढा' पर्याय स्क्रीनशॉट मध्ये दाखविल्याप्रमाणे उजव्या बाजूला वरच्या बाजूस दर्शविला आहे. जर प्रकरण काढावयाचा पर्याय क्लिक केला तर ते "माझी प्रकरणे" यादीमधून प्रकरण काढून टाकेल.

## १०.3 "माझी प्रकरणे"मध्ये शोध –




जेव्हा "माझी प्रकरणे" या पर्याया अंतर्गत एखादयाची अनेक प्रकरणे समाविष्ट असतात तेव्हा 'माझी प्रकरणे' मध्ये उपलब्ध असलेल्या "शोध" ऑप्शनचा वापर करुन तुम्ही एखादया प्रकरणाचा शोध घेऊ शकता. स्क्रीनशॉट मध्ये दर्शविल्यानुसार शोध टॅबमध्ये टाइप करुन आपण आपल्या प्रकरणात नावानुसार, क्रमांकानुसार शोध घेऊ शकता.


## १०.४ रीफ्रेश बटण




रीफ्रेश बटण क्लिक केल्यास “माझी प्रकरणे” अद्ययावत होतील. “माझी प्रकरणे” अंतर्गत जतन केलेली माहिती अद्ययावत करण्यासाठी रीफ्रेश बटण आजच्या प्रकरणांना लागूनच दिली आहे. जर कनेक्शनच्या समस्येमुळे कोणतेही प्रकरण अद्ययावत किंवा रीफ्रेश झाले नाही तर ॲप ही माहिती “कनेक्शन त्रुटी” म्हणून दर्शवेल.

## १०.५ <u>माझी प्रकरणे– तारीखवार / जिल्हावार प्रदर्शन पर्यायः</u>


ई–कोर्टस मोबाईल ॲपची अद्ययावत आवृत्ती 'माझ्या प्रकरणांची' 'तारीखवार आणि जिल्हावार' माहिती प्रदर्शित करते. उदाहरणार्थ, जेव्हा आपण त्यातील 'तारीखवार' पर्यायवर क्लिक कराल, तेव्हा त्याकडून सर्व प्रकरणे तारीखनिहाय दर्शविण्यात येतात. ती त्यांच्या प्रकरणांची डिजिटल दैनंदिनी असल्यामुळे, वकिल किंवा वकिलांचे लिपिक यांच्यासाठी हा पर्याय सोयिस्कर ठरतो. त्याचप्रमाणे, 'जिल्हावार'




प्रकरणे पाहण्याचा पर्याय देखील उपलब्ध आहे. 'तारीखवार आणि जिल्हावार' चा स्क्रीनशॉट येथे दाखविला आहे, आणि जेव्हा केस क्रमांकावर क्लिक केले जाईल, तेव्हा तो 'माझी प्रकरणे' मधील केस शोध पर्यायांमधील संपूर्ण केस इतिहास (हिस्ट्री) उघडेल.

## १०.६ कॅलेंडर (दिनदर्शिका)

एखादी व्यक्ती "माझी प्रकरणे" अंतर्गत संचय केलेली प्रकरणे कॅलेंडर स्वरूपात पाहू शकते. त्यामध्ये, प्रलंबित प्रकरणे तारखेनुसार दर्शविण्यात येतात. तारखेच्या आकडयावर क्लिक केल्यास जिल्हावार प्रलंबित खटल्यांचा तपशील मिळेल. उदाहरणार्थ, 4 सप्टेंबर रोजी, कॅलेंडरमध्ये 3 प्रकरणे दर्शविण्यात आली आहेत आणि त्यावर क्लिक केल्यास, तीन प्रकरणे प्रलंबित असलेली न्यायालये जिल्हावार दर्शविण्यात येतील. येथे अहमदाबाद, गुजरात (१), बारपेटा, आसाम (१), भावनगर, गुजरात (१), ही ठिकाणे दर्शविण्यात आली आहेत. त्यापैकी, अहमदाबाद गुजरात (१) वर क्लिक केल्यास, सोबतच्या स्क्रीनशॉटमध्ये दर्शविल्यानुसार प्रकरणाचा तपशील उघडेल.







## ११) बॅकअप सुविधा


ई–कोर्टस मोबाईल ॲप 'बॅकअप' सुविधा प्रदान करते जी ई–कोर्टस ॲपचे सर्वात मागणी असलेले वैशिष्ट्य आहे. एखादी व्यक्ति, एक्सपो्र्ट आणि इम्पोर्ट पर्यायांतर्गत, मोबाईल उपकरणामध्ये सेव्ह/समाविष्ट केलेल्या प्रकरणांचा बॅकअप घेऊ शकेल. जर आपण आपल्या मोबाईल ॲपमध्ये

बरीच प्रकरणे जतन केली असतील आणि जर आपण नवीन मोबाईल फोन घेत असाल, तर, आपण हया 'एक्सपो्र्ट' आणि 'इम्पोर्ट' पर्यायाचा वापर करून ती माहिती नवीनतम मोबाइल फोनवर डाऊनलोडन करुन घेऊ शकता.




मेनू बटणावर क्लिक करून, आपणास हा 'बॅकअप' पर्याय उपलब्ध आहे. जेव्हा आपण सदर मेनू बटणावर क्लिक करता, तेव्हा 'एक्सपो्र्ट' आणि 'इम्पोर्ट' पर्याय मेनू सूची अंतर्गत उपलब्ध असतात, जे सुलभ संदर्भासाठी येथे स्क्रीनशॉटमध्ये दर्शविलेले आहेत. कमीतकमी एक वेळेस–नियमितपणे डेटा 'एक्सपो्र्ट' करुन तो मोबाइल किंवा गुगल ड्राइव्ह किंवा ईमेलमध्ये ठेवणे आवश्यक आहे. जर आपण डेटा 'एक्सपो्र्ट' केलेला असेल, तर, आवश्यकतेनुसार तो 'इम्पोर्ट' केला जाऊ शकेल. उदाहरणार्थ, मोबाईल फोन बदलताना किंवा अपघाती डेटा गमावल्यास, एखादी व्यक्ति 'इम्पोर्ट' पर्याय वापरू शकते. जर आपण आपला डेटा 'एक्सपो्र्ट' केला नसेल तर, तर आपण हा बॅकअप सुविधा पर्याय डेटा 'इम्पोर्ट' करण्यासाठी वापरू शकत नाही. म्हणून, आपण मोबाईल फोनमधील डेटा 'एक्सपो्र्ट' करण्यास विसरू नका, जेणे करुन तातडीच्या गरजेच्या वेळेस तो आपणास वापरता येईल.

## ११.१ एक्सपो्र्ट पर्याय




'एक्सपो्र्ट' हा पर्याय मोबाईल ॲपमधील मेनू सूचीत उपलब्ध आहे. जेव्हा 'एक्सपो्र्ट' हया पर्यायावर क्लिक केले जाईल, तेव्हा त्या फायली कुठे 'एक्सपो्र्ट' करावयाच्या हे विचारले जाईल. आपण आपल्या फायली ईमेलद्वारे 'एक्सपो्र्ट' किंवा 'शेअर' करू शकता अथवा गुगल ड्राइव्हमध्ये किंवा आपल्या फोनमध्येच संचयित करू शकता. गूगल ड्राईव्हवर संचयित होण्याच्या वेळेस, गूगल कडून सुरक्षिततेसंदर्भात प्रश्न विचारण्यात येऊ शकतात आणि आपण 'ॲडमिट' (स्वीकृत) येथे क्लिक केल्यानंतर, बॅकअप गुगल ड्राइव्हवर संचयित करुन ठेवण्यात येईल आणि जेव्हा आवश्यकता असेल तेव्हा गुगल ड्राइव्ह वरून बॅकअप पुनःप्राप्त केला जाऊ शकेल. फायली 'एक्सपो्र्ट' करण्यासाठीचे उपरोक्त तीन पर्याय म्हणजेच (१) ईमेल वरुन शेअर करणे (2) (गूगल) ड्राइव्हवर जतन करणे आणि(३) हया डिव्हाइसमध्येच म्हणजे मोबाईल फोनमध्ये जतन करणे. हे सुलभपणे सोपे समजण्यासाठी स्क्रीनशॉटमध्ये दर्शविले आहे. तीनपैकी कोणत्याही एका पर्यायाचा वापर करून, आपण आपल्या मोबाईल ॲप्लिकेशनवरील संचयित डेटा 'एक्सपो्र्ट' करु शकाल आणि तो 'टेक्स्ट फाईल' फॉरमॅट मध्ये जतन करु शकाल.'एक्सपो्र्ट' प्रक्रिया पूर्ण झाल्यावर,मोबाईल फोनमध्ये, सोबत दर्शविल्यानुसार

आपल्याला 'यशस्वीरित्या जतन झाले' असा एक संदेश मिळेल. सदरची 'टेक्स्ट फाईल' मोबाईलच्या स्टोरेजमधून पुनःप्राप्त केली जाऊ शकते.


### ११.२ इम्पोर्ट पर्याय :

ई-कोर्ट्स ॲप मोबाईल वापरणाऱ्यांमध्ये इम्पोर्ट पर्याया या वैशिष्ट्याची सर्वाधिक मागणी आहे जर आपण आपला फोन बदलणार असाल किंवा आपला फोन डेटा नष्ट झाल्यास काय करावे? त्यावेळेस हा इम्पोर्ट पर्याय फायदेशीर आहे. आपण हा इम्पोर्ट पर्याय वापरू शकता आणि नवीन फोन मध्ये डेटा बॅकअप घेऊ शकता. जेव्हा फोन मधून डेटा चुकून डिलीट होतो तेव्हा कोणीही हा इम्पोर्ट पर्याय वापरू शकतो आणि आपल्या फोन मध्ये डेटा रिस्टोअर करू शकतो.

आपण इम्पोर्ट आयकॉन (चिन्ह) क्लिक करू शकता आणि दोन पर्यायांमध्ये डेटा इम्पोर्ट करू शकता.

१. ड्राइव्ह वरून इम्पोर्ट करणे आणि

२. डिवाइस वरून इम्पोर्ट करणे.




सोबत जोडलेल्या स्क्रीनशॉट मध्ये “इम्पोर्ट फ्रॉम” अंतर्गत दोन पर्याय दर्शविलेले आहेत. आपण किमान एकदा गुगल ड्राईव्ह

वरून बॅकअप डेटा इम्पोर्ट करणे योग्य ठरेल म्हणजे गुगल ड्राईव्ह परवानगी विचारेल आणि डेटा इम्पोर्ट करण्यासाठी आपण अलाऊ बटनावर क्लिक करू शकता. सदरचा स्क्रीन शॉट देखील सोबत दिलेला आहे. इम्पोर्ट या पर्यायातील कृती पूर्ण झाल्यावर आपणास “प्रकरणे यशस्वीरीत्या इम्पोर्ट” असा संदेश मिळेल. अशा प्रकारे आपण इम्पोर्ट पर्याय वापरू शकता आणि आपल्या नवीन मोबाईल फोन मध्ये डेटा बॅकअप मिळवू शकता किंवा आपल्या जुन्या मोबाईल फोन वरून डेटा बॅकअप रिस्टोअर करू शकता.

## १२.क्यूआर कोड वापरून प्रकरण स्थिती मिळवणे :

ई– कोर्ट्स सेवा मोबाईल ॲपचा वापर करीत असताना प्रत्येक वेळी प्रकरणाची स्थिती मिळविण्यासाठी प्रकरण क्रमांक अभिलेख (सीएनआर) क्रमांक टाईप करणे किंवा प्रकरणाची सद्यस्थिती मिळविण्यासाठी प्रत्येक वेळी प्रकरणाचा तपशील टाईप करणे एखाद्याला कठीण वाटू शकते. त्यावेळी ई–कोर्ट्स मोबाईल ॲप मध्ये क्यूआर कोड स्कॅन पर्याय वापरून प्रकरणाचा तपशील मिळवणे हा आणखी एक सोपा मार्ग आहे.

### १२.१: कृती १ –आपल्या प्रकरणाचा क्यूआर कोड मिळवणे:

ई–कोर्ट्स सेवा मोबाईल ॲप मधून केस हिस्टरी अंतर्गत आपल्या प्रकरणाचा क्यूआर कोड मिळवा किंवा ई–कोर्ट्स सेवेचे संकेतस्थळ http://e–Courts.gov.in यावरूनही केस हिस्टरी अंतर्गत आपल्या प्रकरणाचा क्यूआर कोड मिळवा.

## १२.२ : कृती २– क्यूआर कोडची प्रिंटाऊट घ्या आणि प्रकरणाच्या डॉकेटमध्ये लावा:




एखादी व्यक्ती क्यूआर कोड ची प्रिंट आऊट घेऊ शकते आणि प्रकरण फाईल मध्ये लावू शकते.


## १२.३ कृती –3– क्यूआर कोड स्कॅन करा:

एखादी व्यक्ती ई–कोर्ट्स मोबाईल ॲप मध्ये अंतर्भूत असलेला “स्कॅन क्यूआर कोड “ पर्याय वापरून प्रकरण डॉकेटवर लावलेला क्यूआर कोड स्कॅन करू शकते ज्यामुळे लगेचच प्रकरणाची स्थिती दर्शविली जाईल. असे क्यूआर कोड स्कॅनिंग हे मोठ्या प्रमाणावर प्रकरणे असलेल्या वकिलाचे कार्यालय आणि कंपन्या/ सरकारी संस्था यांच्यासाठी फायद्याचे ठरेल. ते क्यूआर कोड ची प्रिंट आउट घेऊ शकतात आणि त्यांच्या केस फाईल्समध्ये लावू शकतात आणि त्यांच्या मोबाईल ॲप– स्कॅन क्यूआर कोड पर्यायांमधून स्कॅन करू शकतात आणि एक एक करून सगळे मुद्दे न भरता त्वरित प्रकरणाचा तपशील मिळवू शकतात.

## १३. जेथे इंटरनेट नाही तेथे एसएमएस द्वारे प्रकरणाची स्थिती मिळवा:

आपल्या देशात ५०% पेक्षा जास्त लोकांकडे इंटरनेटचा वापर करण्याची सुविधा नाही. ई–कमिटीच्या अध्यक्षांनी पूर्नरुच्चार केल्यानुसार तांत्रिक दरी भेदण्यासाठी सर्वसमावेशक व्यवस्था

आपल्याकडे असायला हवी आणि ज्या लोकांकडे इंटरनेट वापराची सुविधा नाही अशा लोकांची गरज भागवण्यासाठी ही सेवा म्हणजे असे एक वैशिष्ट्य आहे. जेव्हा आपल्याकडे इंटरनेट कनेक्शन नसेल तेव्हा एखादी व्यक्ती ई–कोर्ट्स <स्पेस> <तुमचा सी.एन.आर नंबर> हा एसएमएस 9766899899 या नंबर वर पाठवून प्रकरणाची स्थिती मिळवू शकते.




## १४. ई–कोर्ट्स स्वयंचलित ई–मेल सेवां द्वारे प्रकरणाची स्थिती प्राप्त करणे:

जरी ई–कोर्ट्स मोबाईल ॲपसाठी स्वयंचलित ई–मेल सेवा ही प्रचलित नसली तरीही जर आपल्याला मोबाईल फोन मध्ये ई–मेल चेक करण्याची सवय असेल तर हे एक असे वैशिष्ट्य आहे ज्याचा वापर तुम्ही तुमच्या मोबाईल मधून करू शकता. ही आकर्षक स्वयंचलित ई–मेल सेवा सक्रिय करण्यासाठी पक्षकार आणि वकिलांनी त्यांचा इमेल संबंधित न्यायालयात नोंदवावा लागेल. नोंदणीकृत वापरकर्त्यांना प्रकरणाची सद्यस्थिती, पुढील सुनावणीची तारीख, ऑर्डर, निर्णय आणि वाद सूची यांच्या प्रती मिळतील. एके दिवशी अविनाशी दुय्यम न्यायालयात प्रॅक्टिस करणारी वकील




आली आणि तिने खटल्याच्या क्रमांका संदर्भात तिला मिळालेल्या पहिल्या स्वयंचलित ई–मेल बद्दल तिला झालेला आनंद आणि आश्चर्य व्यक्त केले. सदर ईमेल बाबतचा स्क्रीन शॉट वाचकांसाठी सोबत दिलेला आहे. आता तो दिवस दूर नाही जेव्हा एखादी व्यक्ती घर बसल्या तिला न्यायालयाकडून हव्या असणाऱ्या सर्व प्रमाणित प्रती आरामात, घरबसल्या प्राप्त करू शकेल.

## १५. न्यायालय संकुल स्थाननिर्देशक -

ई– न्यायालय मोबाइल ॲप्लीकेशन मध्ये एक नवीन पर्याय– न्यायालय संकुल स्थाननिर्देशक,जे पक्षकारांना सहज उपलब्ध होणारे साधन आहे,(संकुल स्थाननिर्देशक समाविष्ट केलेले आहे.) जर पक्षकारास दूरच्या न्यायालयाकडून समन्स प्राप्त झाले आणि सदर पक्षकारास न्यायालयाचे स्थान माहीत नसेल, तर तो न्यायालय संकुल स्थाननिर्देशक




वापरु शकतो आणि नकाशामध्ये न्यायालयाचे स्थान शोधू शकतो आणि न्यायालय संकुल स्थाननिर्देशक हा पर्याय वापरुन तो न्यायालयात पोहचू शकतो. सदर न्यायालय संकुल स्थाननिर्देशक पर्याय 'भुवन' या भारतीय मॅपिंग ॲप वर काम करते आणि कोंइम्बतूर येथील न्यायालय शोधण्याचा स्क्रीनशॉट येथे दाखविण्यात आला आहे.

## १६. ई– न्यायालय मोबाइल ॲप मेनू मधील विविध दुवे:–


ई- न्यायालय मोबाइल ॲप मध्ये ई- न्यायालय सेवेचे महत्वाचे दुवे सुध्दा दिलेले आहेत. मेन्यू पर्यायांतर्गत खालील लिंक्सपर्यंत पोहचू शकतो.




- ➔ ई–पे
- ➔ एनजेडीजी
- ➔ ई–फायलिंग
- ➔ इंडिया कोड
- ➔ वकिलांकरता प्रपत्रे
- ➔ आभासी न्यायालये

हे सर्व दुवे ई–न्यायालय सेवा वेबसाईट अंतर्गत उपलब्ध आहेत. उदाहरणार्थ जर एखाद्याला ऑनलाइन दंड भरायचा असेल तर आपण थेट मोबाईल ॲपवरुन 'आभासी न्यायालये' लिंक वर क्लिक करू शकता आणि 'आभासी न्यायालये' पोर्टलवर प्रवेश करू शकता आणि न्यायालयात न जाताही दंड भरु शकता. म्हणूनच हे दुवे प्रत्यक्ष सिद्धगणक (रेडी रेकनर) म्हणून वापरले जाऊ शकतात.


## १७. ई–न्यायालयांच्या मोबाईल ॲपमधील ई–पे दुवा:–




जेव्हा तुम्ही ई–पे या पर्यायावर क्लिक कराल तेव्हा ते तुम्हाला https://pay.e–Courts.gov.in या (संकेतस्थळावर) घेऊन जाईल जेथे तुम्ही न्यायालयीन फी, न्यायिक ठेव तसेच दंड व शिक्षेची रक्कम भरू शकता. तुम्ही तुमचा सी.एन.आर. क्रमांक किंवा प्रकरण क्रमांक वापरून तसेच मोबाईल क्रमांक वापरून डिजिटल भरणा करू शकता.

### १८. ई न्यायालय मोबाईल ॲप मधील एनजेडीजी लिंकः-

जेव्हा तुम्ही एनजेडीजी या बटन वर क्लिक करता तेव्हा ते तुम्हालाथेट [https://njdg.e-Courts.gov.in](https://njdg.e-Courts.gov.in) अंतर्गत एनजेडीजी या लिंक वर घेऊन जाते, जेथे तुम्हाला खालील तपशील मिळू शकतो. १८.१




नॅशनल जुडिशियल डेटा ग्रिड (जिल्हा आणि तालुका न्यायालये) १८.२ नॅशनल जुडिशियल डेटा ग्रिड (उच्च न्यायालये).एनजेडीजी वापरताना तुम्ही ड्रील डाउन मधील पर्याय वापरून प्रथम राज्य आणि त्यानंतर जिल्हा निवडणे आवश्यक आहे आणि तुम्हाला प्रलंबित प्रकरणे, निकाली काढण्यात आलेली प्रकरणे, प्रकार-निहाय, स्थिती-निहाय प्रकरणे इत्यादी विविध तपशील मिळू शकतात. ड्रिल डाऊन पर्यायांचा अनुभव घेण्यासाठी आपण आपल्या मोबाईल मधील ॲपच्या ड्रिल डाऊन पर्यायावर जा.

njdg.ecourts.gov.in

**NJDG for High Courts**


High Court:- All GO Welcome Guest

| | | | |
|---|---|---|---|
| 2072618 Civil Cases(Pending) | 1361099 Criminal Cases(Pending) | 1358926 Writ Cases(Pending) | 4792643 Total Cases(Pending) |
| 1467621 * Civil Cases more than 1 Years(Pending) | 928626 * Criminal Cases more than 1 Years(Pending) | 959753 * Writ Cases more than 1 Years(Pending) | 3356000 * Total Cases more than 1 Years(Pending) |


* Cases Pending more than one year figures do not include High Court of Bombay, Delhi and Madhya Pradesh as these HC's are not shifted to Case Information System NC 1.0 developed by eCommittee, Supreme Court of India.

SUMMARY REPORT OF INDIA AS ON DATE :-- 19/06/2020


| PARTICULARS | CIVIL CASES | CRIMINAL CASES | WRIT PETITION | TOTAL CASES | PERCENTAGE |
|---|---|---|---|---|---|
| Cases Filed In Last Month | 5836 | 19819 | 9476 | 35131 | (0.73%) |
| Cases Disposed In Last Month | 5868 | 17133 | 6766 | 29767 | (0.62%) |
| Cases Disposed In Last Month (more than 10 years old) | 413 | 199 | 360 | 972 | (0.02%) |
| Pre-Registration | | | | | |
| Cases-Under Objection | 65330 | 32200 | 15156 | 112687 | (2.34%) |
| Cases-Pending Registration | 325567 | 118235 | 90289 | 534090 | (11.11%) |
| Pending Cases Age Wise | | | | | |
| Cases Pending (0 to 1 year ) | 441971 | 368963 | 306725 | 1117659 | (23.32%) |
| Cases Pending (1 to 3 years ) | 519871 | 293099 | 313198 | 1126168 | (23.5%) |
| Cases Pending (3 to 5 years ) | 299228 | 171245 | 216274 | 686747 | (14.33%) |
| Cases | | | | | |




Click to View High Court Wise



## १९. ई–न्यायालय मोबाईल ॲपद्वारे इंडिया कोड ॲक्सेस-




ई–न्यायालयाच्या मोबाईल ॲप्लिकेशन मध्ये इंडिया कोडचा एक नवीन विकल्प समाविष्ट केला आहे ज्याचा वापर करुन सर्व अधिनियम,कायदे, विनियम, अधिसूचना इत्यादी यांची माहिती मिळू शकते. तुमच्या मोबाईलमध्ये सर्व 'बेअर ॲक्टस' (थोडक्यात कायदे) साठी हा एक उत्तम सिद्धगणक आहे. उदाहरणार्थ जर तुम्हाला दिवाणी प्रक्रिया संहितेमधील एखादे कलम पहायचे असेल तर ते तुम्ही सोबत दाखविल्याप्रमाणे मोबाईल ॲप लिंकवरून सहजरित्या मिळवू शकता.

## १९.१ इंडिया कोड मध्ये 'बेअर ॲक्टस' (थोडक्यात कायदे) शोधणेः–

जर तुम्हाला एखादा अधिनियम शोधायचा असेल तर तुम्हाला सर्च बॉक्स मध्ये सर्चिंग कोड टाईप करावा लागेल आणि मग तो तुम्हाला इंडिया कोडमधून मिळू शकेल. उदाहरणार्थ तुम्हाला



फौजदारी प्रक्रिया संहिता किंवा दिवाणी प्रक्रिया संहिता हवी असेल तर ते तुम्ही बॉक्समध्ये टाईप करून मिळवू शकता.


## २०.ई फायलिंग मोबाईल ॲप मध्ये ई फाईलिंग लिंक





ई फाईलिंग, ई पेमेंट आणि एनजेडीजी सारख्या ई कोर्ट सेवेमध्ये आपण प्रवेश करु शकता एकदा तुम्ही ई फिलिंग ॲप्लीकेशनवर क्लिक केल्यास ते तुम्हाला ई फाईलिंग पोर्टल [https://filing.e-Courts.gov.in](https://filing.e-Courts.gov.in) वर घेऊन जाईल आणि भारताच्या नकाशावरून आपण आपले संबंधित राज्य निवडू शकता आणि ई-फाईल दाखल करू शकता.आपण ई-फाईलिंग पोर्टल अंतर्गत प्रदान केलेल्या मदत व्हिडिओ आणि ट्यूटोरियलमध्ये प्रवेश करू शकता आणि ई-फाईलिंग दाखल करू शकता आणि डिजिटल युगाचे वकिल होऊ शकता.

## २१ ई कोर्टस  मोबाईल ॲपमध्ये व्हर्च्युअल कोर्टांचा लिंक:-


एखादी व्यक्ती मोबाइल ॲप्लिकेशनमधील लिंकद्वारे व्हर्च्युअल कोर्टात प्रवेश करू शकते- व्हर्च्युअल कोर्ट पोर्टलवर देण्यात येणाऱ्या सेवा म्हणजे मोबाईल नंबर, सीएनआर, पार्टीचे नाव, चालान व वाहन क्रमांकाद्वारे शोधणे.  व्हर्च्युअल कोर्टाच्या लिंककडे जाणा-या मोबाईल ॲप्लिकेशनचा उपयोग करून/एखादा दंड भरू शकतो. न्यायालयात न जाता मोटार अपघात प्रकरणात दंड भरून आणि व्हर्च्युअल कोर्ट पोर्टलमध्ये लॉग इन करून एखादा माणूस आपला खटला निकाली काढू शकतो.





## २२. ई–कोर्टस् मोबाईल ॲपमध्ये वकिलांच्या लिंकसाठी फॉर्म :–

ई–कोर्ट मोबाइल ॲप्लिकेशन मेनू अंतर्गत एक उपयुक्त दुवा उपलब्ध आहे – अधिवक्तांसाठी फॉर्म जो नवीनतम जोड आहे. जर हा लिंक क्लिक केला असेल तर तो आपल्याला वकिलांनी वापरल्या जाणाऱ्या विविध प्रकारच्या फॉर्मशी लिंक साधेल. उदाहरण: जामीन बाँड, कॉपी मिळणेसाठीच्या अर्जाचा फॉर्म (सीए फॉर्म); प्रकरणातील माहितीचे प्रारूप, फॉर्म भरणे, अनुक्रमणिका फॉर्म, उपस्थितीचे ज्ञापन, कागदपत्रे सादर करण्याची सूचना, जमानती बाँड, वकालतनामा बाँड. आशा आहे की हे आपणास हा उपयुक्त लिंक तपासण्यासाठी चौकस करेल.



## २३. मदत पर्याय :

ई-कोर्ट सेवे अंतर्गत विविध पर्याय कसे वापरावे या मदत पर्यायांतर्गत दर्शविले गेले आहे जे जेव्हा शंका उद्भवेल तेव्हा मदत करेल. जेव्हा आपण मदत अंतर्गत प्रत्येक टॅबवर क्लिक करता तेव्हा ते वैशिष्ट्यांचा वापर करण्यासाठी मार्गदर्शक प्रतिमांसह कृती देखील दर्शवेल. उदा. जर आपण ई-कोर्ट सर्विस ॲप अंतर्गत माझ्या प्रकरणांच्या टॅबवर क्लिक केले तर ते स्क्रीनशॉटमध्ये दर्शविल्यानुसार मदत तपशील उघडेल ज्याचा आपण अनुसरण करू शकता आणि मेनू वापरण्यास प्रारंभ करू शकता.







*आजच ई-कोर्ट मोबाईल ॲप डाउनलोड करा !*
*आणि आपल्या प्रकरणाची स्थिती आपल्या हॅण्डसेट्सवर २४×७ विनामूल्य मिळवा*

# भारतातील उच्च न्यायालये/जिल्हा न्यायालये/तालुका न्यायालये यांच्यासाठी इ-न्यायालये सेवा मोबाइल अँप

## अँड्रॉइड आणि आय ओ एस यासाठी इ-न्यायालये सेवा अँप

GET IT ON Google Play

Download on the App Store




- आपल्या हातात (संचात) २४× ७ माझी प्रकरणे मधून प्रकरण स्थिती, वाद सूची, न्यायालयाचे न्यायनिर्णय/आदेश मिळवा, आपली प्रकरणे जतन करा.
- संपूर्ण प्रकरण इतिहास मिळवा.
- आपले न्यायनिर्णय/आदेश पहा.
- न्यायालय संकुल लोकेटर मिळवा.
- विशिष्ट सीएनआर क्रमांकाने प्रकरणे शोधा. सीएनआर क्रमांक http://services.ecourts.gov.in/ या संकेतस्थळावरुन मिळवा.
- क्यूआर कोड स्कॅन वापरुन स्थिती मिळवा क्यूआर कोड http://services.ecourts.gov.in/ या संकेतस्थळावरुन मिळवा.
- प्रकरण क्रमांक/फाइलिंग क्रमांक/ एफ.आय.आर. क्रमांक/पक्षकाराचे नाव/ वकीलाचे नाव/ अधिनियम/प्रकरणाचा प्रकार यांचा वापर करुन प्रकरण स्थिती शोधा.
- वाद सूची मिळवा.
- "माझी प्रकरणे" या पर्यायात आपली प्रकरणे संग्रहित करा आणि त्यांचा मागोवा घ्या.
- "माझी प्रकरणे" यामध्ये आजच्या प्रकरणाचे " सतर्कता (अलर्टस) मिळवा.
- कॅलेंडर पर्याय मिळवा.

डाउनलोड

http://services.ecourts.gov.in/

**इ–न्यायालय वेबपृष्ठावरुन अँड्रॉइड आणि आय.ओ.एस. साठी इ–न्यायालय मोबाइल अँप**